# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.01.2026** **वारःगुरुवार**

---

1. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिव देहावर बारामती इथं आज अंत्यसंस्कार, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित राहाणार.
2. अजित पवारांच्या निधनानं दिलदार मित्र गमावल्याची मुख्यमंत्र्यांची भावना,
3. प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राच्या गणेशोत्सवः आत्मनिर्भरतेचे प्रतीक या चित्ररथाला प्रथम क्रमांक आणि
4. एनसीसीच्या संचलनामध्ये महाराष्ट्राची तनु भान ठरली सर्वोत्कृष्ट छात्र

**अजित पवार**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तसंच अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार याच्या पार्थिवावर आज सकाळी 11 वाजता बारामती इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य मंत्रीमंडळातील इतर मंत्रीही अंत्यसंस्काराला उपस्थित राहाणार आहेत. पवार यांचा पार्थिव देह त्यांच्या काटेवाडी इथल्या घरी नेण्यात आला आहे. काही वेळातच बारामतीतल्या गदिमा सभागृहापासून पवार यांच्या अंतिम प्रवासाला सुरुवात होणार आहे. हजारो कार्यकर्ते, नागरिकांची विद्या प्रतिष्ठानच्या आवारात गर्दी पहायला मिळत आहे.

अजित पवार यांचं काल सकाळी विमान अपघातात आकस्मिक अकाली निधन झालं. ते 66 वर्षांचे होते. पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारासाठी बारामतीमध्ये निघालेल्या अजित पवारांच्या विमानाला लँडिंग करताना अपघात झाला. मृतांमध्ये अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षा रक्षक विदीप जाधव, वैमानिक सुमित कपूर, शांभवी पाठक आणि विमान कर्मचारी पिंकी माळी यांचा समावेश आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. या काळात कोणतेही सरकारी जाहीर कार्यक्रम होणार नाहीत. तसेच सरकारी कार्यालयांवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आले आहेत.

**अजित पवार-श्रद्धांजली**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक अपघाती निधनाबद्दल सर्वच स्तरांतील नेत्यांनी आणि नागरिकांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्रीमंडळातील मंत्र्यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे कधीही भरुन न येणारं नुकसान झालं आहे. ते अत्यंत मेहनती नेते होते, सहकाराच्या माध्यमातून लोककल्याणासाठी त्यांनी केलेलं काम सदैव स्मरणात राहील असं या नेत्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अजित पवार यांच्या निधनाबाबत शोकप्रस्ताव मांडला. त्यात अध्यक्षांनी नमूद केलं की, अजित पवार दहाव्या लोकसभेचे सन्माननीय सदस्य होते. सहा वेळा उपमुख्यमंत्री आणि आठ वेळा विधानसभेचे सदस्य म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर आपली पकड निर्माण केली होती.

सार्वजनिक जीवनातील त्यांची बांधिलकी सदैव स्मरणीय राहील. यानंतर संपूर्ण सभागृहानं दिवंगत नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनीही अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. पवार यांच्या कुटुंबियांना, सहकाऱ्यांना आणि असंख्य समर्थकांना हा दुःखद प्रसंग सहन करण्याचे धैर्य प्रदान करो, अशी ईश्वराकडे प्रार्थना करतो, असं राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

अजित पवार यांच्या जाण्यानं एक दिलदार मित्र गमावल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली....

**श्री अजितदादा पवार महाराष्ट्रातले एक लोकनेते होते आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला महाराष्ट्राच्या प्रश्नांची जाण असलेला अशा प्रकारचा हा नेता होता की ज्यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये प्रचंड मोठी आस्था होती. अजित दादा एक अतिशय संघर्षशील. अशा प्रकारचं नेतृत्व होतं. आणि सर्व परिस्थितीमध्ये न डगमगता पुढे जाणारं अशा प्रकारचं व्यक्तिमत्व होतं. महाराष्ट्राकरता आजचा दिवस हा अतिशय कठीण दिवस आहे. कारण अशा प्रकारचं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. आणि ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण योगदान ते देत होते. अशा काळामध्ये त्यांचं निघून जाणं हे अविश्वसनीय आहे. मनाला चटका लावणार आहे. माझ्याकरता तर वैयक्तिक, एक दमदार आणि दिलदार अशा प्रकारचा मित्र या ठिकाणी सोडून गेलेला आहे.**

कर्तृत्ववान अजित पवार यांच्या निधनानं राज्याचं झालेलं नुकसान कधीही भरून न येणारं आहे असं सांगत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दुःख व्यक्त केलं. हा निव्वळ अपघात असून त्यात राजकारण आणू नये असं ते म्हणाले. राज्य विधीमंडळातल्या अनेक नेत्यांनी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

## अपघात चौकशी

विमान अपघात तपास विभागाकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी केली जाणार आहे. नागरी विमान उड्डाण मंत्रालयानं ही माहिती दिली आहे. चौकशी पथक दिल्लीतून बारामतीला रवाना झाल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

## पंतप्रधान-सीईओ

भारत ऊर्जा सप्ताह 2026चा भाग म्हणून काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक ऊर्जा क्षेत्रातील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधला. भारताच्या बळकट आर्थिक गतीवर प्रकाश टाकताना पंतप्रधानांनी भारत जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वाटचाल करत असून, जागतिक ऊर्जा मागणी- पुरवठा संतुलनामध्ये निर्णायक भूमिका बजावेल असा विश्वास व्यक्त केला. या संवादादरम्यान, पंतप्रधानांनी भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वपूर्ण गुंतवणुकीच्या संधींकडे लक्ष वेधलं. तसंच गुंतवणुकदार स्नेही धोरणात्मक सुधारणांचा उल्लेख करत अन्वेषण आणि उत्पादनामध्ये 100 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या गुंतवणुकीची शक्यता अधोरेखित केली. कॉम्प्रेस्ड बायो गैसमध्ये 30 अब्ज अमेरिकन डॉलर्सची संधी असल्याचेही सांगितले. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी आणि पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी तसेच मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारीही याप्रसंगी उपस्थित होते.

## पंतप्रधान विंग्ज

गेल्या दशकभरात देशाच्या विमान वाहतूक क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन झालं असून, ती जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी देशांतर्गत विमान वाहतूक बाजारपेठ झाली असल्याचं काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. हैदराबादमध्ये सुरू झालेल्या विंग्ज इंडिया 2026 कार्यक्रमामध्ये दूरस्थ संदेशाद्वारे पंतप्रधान बोलत होते. एकेकाळी देशातील विमान प्रवास हा निवडक लोकांपुरता मर्यादित होता, मात्र चित्र बदललं असून, तो विमान प्रवास सर्वांसाठी सुलभ होत असल्याचे मोदी म्हणाले.

देश,  विमान निर्मिती, प्रगत हवाई गतिशीलता आणि कंत्राटी विमाने यांसारख्या क्षेत्रामध्ये विमान वाहतुकीच्या संधी देणारी भूमी म्हणून स्वतःला स्थापित करत असल्याचं मोदी म्हणाले.

**आर्थिक सर्वेक्षण**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज नव्या 2025-26 या वर्षासाठीचा आर्थिक सर्वेक्षण सादर करणार आहेत. मुख्य आर्थिक सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाने तयार केला आहे. देशाच्या सद्य आर्थिक स्थिती आणि भविष्यातील दृष्टीकोनाचे सर्वसमावेशन पुनरावलोकन करणारे हे आर्थिक सर्वेक्षण असते. येत्या एक फेब्रुवारीला केंद्रीय अर्थसंकल्प सादर होणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा 23 फेब्रुवारीपर्यंत तर दुसरा टप्पा 9 ते 2 एप्रिल दरम्यान होणार आहे.

**संचलनरथ**

प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी झालेल्या सर्वोत्तम चित्ररथ आणि तुकडी यांचे निकाल काल जाहीर करण्यात आले आहेत. तिन्ही सेवा दलांपैकी भारतीय नौदलाला सर्वोत्त मार्चिंग तुकडी म्हणून घोषित करण्यात आले.तर राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या श्रेणीत महाराष्ट्राच्या गणेशोत्सवः आत्मनिर्भरतेचे प्रतीक या चित्ररथाला प्रथम क्रमांक पटकावला आणि जम्मू आणि काश्मीरचा 'जम्मू आणि काश्मीरच्या हस्तकला आणि लोकनृत्य', केरळचा 'वॉटर मेट्रो आणि 100 टक्के डिजिटल साक्षरता: आत्मनिर्भर भारतासाठी आत्मनिर्भर केरळ' हे चित्ररथ अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आले. केंद्र सरकारी मंत्रालय आणि विभागांमध्ये संस्कृती मंत्रालयाच्या 'वंदे मातरम - एका राष्ट्राची आत्मिक हाक' या चित्ररथासाठी पुरस्कार जिंकला.मायगव्ह पोर्टलवरील ऑनलाइन मतदानावर आधारित 'पॉप्युलर चॉइस अवॉर्ड्स' देखील जाहीर करण्यात आले.

**सर्वोत्कृष्ट कॅडेट-महापरिचय**

प्रजासत्ताक दिनाच्या संचलनानंतर दिल्लीच्या करिअप्पा मैदानावर पार पडलेल्या एनसीसीच्या संचलनामध्ये महाराष्ट्राच्या तनु भान हिला सर्वोत्कृष्ट कॅडेट हा सर्वोच्च बहुमान मिळवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल दिमाखदार सोहळ्यात तनु भान यांना सुवर्ण पदक, मानाची केन देऊन गौरवण्यात आलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि एनसीसीचे महासंचालक लेफ्टनंट जनरल वीरेंद्र वत्स उपस्थित होते.

**बिटिंग रिट्रीट**

दरम्यान, 77व्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याची सांगता करणारा परतीची धून अर्थात बिटिंग रिट्रीट समारंभ आज दिल्लीत विजय चौकात होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच केंद्रीय मंत्री उपस्थित राहाणार आहेत. या समारंभात लष्कर, नौदल, वायुसेना आणि केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाचे वाद्यवृंद सहभागी होणार आहेत.

**क्रिकेट**

20 षटकांच्या क्रिकेट मालिकेत काल विशाखापटणम् इथं चौथ्या सामन्यात भारताला न्यूझीलंडकडून 50 धावांनी पराभव पत्करावा लागला. प्रथम फलंदाजी करत न्यूझीलंडनं निर्धारित 20 षटकात सात गडी गमावून 215 धावा केल्या. या मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना रविवारी तिरुवनंतपुरम इथं होणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.